# कुपोषणमुक्तीसाठी घर भेट उपक्रम राबवा

## डॉ. बंग : जंतुदोषाने होणाऱ्या कुपोषणाकडे दुर्लक्ष, वर्षाला ६० हजार बालमृत्यू

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. २ : राज्यात बालमृत्यूचे प्रमाण ५ टक्क्यांवर खाली आले आहे. त्या तुलनेत कुपोषण मात्र वर्षाला १ टक्का दराने कमी होत आहे. कुपोषणावर मात करण्यासाठी आईला सक्षम बनवणे गरजेचे आहे. सोबतच भावी पिढी कुपोषणमुक्त करण्याच्या दृष्टीने अंगणवाडीसेविकांनी घरोघरी भेट देण्याचा कार्यक्रम शासनाने सुरू करावा, असे मत सर्चचे संस्थापक डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केले.

न्यूरोलॉजिकल सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने शनिवारी आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी आले असता डॉ. बंग यांनी पत्रकारांशी संवाद साधला. एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडी कर्मचाऱ्यांमार्फत कुपोषण दूर करण्यासाठी पोषण कार्यक्रम राबवला जातो. परंतु, तीन वर्षांचे मूल हातात ताट घेऊन अंगणवाडीपर्यंत चालत येते. त्या मुलांचे पोषण हा कार्यक्रम अर्धवट आहे. कुपोषण हे मातेच्या पोटातून सुरू होते. कुपोषित बाळ जन्माला येते. दोन वर्षे ते कुपोषित असते. दोन-तीन वर्षांनंतरच्या मुलांच्या पोषणासाठी अंगणवाडीसेविका पुढे येते. कुपोषणाचा संबंध केवळ आहाराशी निगडित असून, तो जंतुसंसर्गाशीदेखील आहे. याकडे दुर्लक्ष होत आहे, असेही बंग म्हणाले.



डॉ. अभय बंग

जंतुदोष दूर करण्याचा कृती कार्यक्रम राबविण्याचे काम देशातील १६ लाख तसेच राज्यातील १ लाख अंगणवाडीतून व्हावे. यासाठी सरकारने तसे धोरण तयार करण्याची गरज आहे.

### तंबाखूमुक्तीसाठी मुक्तिपथ

**तंबाखूजन्य गुटख्यावर बंदी असताना सर्रास विक्री होत आहे. यामुळेच गडचिरोली तसेच राज्यातही कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून व्यापक जागृती, सरकारी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, व्यसनमुक्ती आणि गावसंघटन या चतु:सूत्री कार्यक्रमावर आधारित टास्क फोर्स नेमले असून, मुक्तिपथ नावाची योजना सुरू केली आहे, असे डॉ. बंग म्हणाले.**

### विद्यमान सरकारकडून आर्थिक सुधारणांवर भर

**विद्यमान सरकारकडून आर्थिक सुधारणांवर विश्वास असले तरी कुपोषण कमी करण्यात सरकारला फारसे यश आलेले नाही. शहरी भागात बालमृत्यूचा दर १६ टक्के आहे. वर्षाला दरवर्षी ६० हजारांवर बालमृत्यू होतात. बालमृत्यूदर आणखी कमी करायचा असेल, तर आईचे पोषण आणि आशा वर्करला आदिवासी पाड्यांमधील प्रत्येक गर्भवतीपर्यंत पोहोचवण्याचा आराखडा तयार करावा लागेल, असे डॉ. बंग म्हणाले.**

कुपोषित बालकाला आहार दिल्यास शरीरापुरते कुपोषण दूर होईल. मात्र, कुपोषणाचा मेंदू विकासावर होणारा प्रभाव कायम राहील. बुद्धीचा विकास आणि आकलनशक्ती कमी होते. पुढच्या सत्तर वर्षांपर्यंत हे परिणाम भोगावे लागतात, असेही डॉ. बंग म्हणाले.



# कुपोषणातील घट संथगतीने : डॉ. अभय बंग

## दारूबंदी १०० टक्के व्हावी

बंदीमुळे दारू ५० टक्के कमी झाली, पण ती १०० टक्के झाली नाही. गुटखाबंदी केवळ कागदावर असून तिची अंमलबजावणी झाली नाही. व्यसनमुक्तीसाठी गडचिरोली जिल्ह्यात सर्चने मुक्तिपथ अभियान सुरू केले आहे. त्यानुसार सर्वेक्षणही केले. त्याआधारे आराखडा तयार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांनी भरपूर वेळ देऊन आराखडा समजावून घेतला. ते टास्क फोर्सचे अध्यक्षही झाले. व्यापक जनजागृती, सरकारच्या कामाची अंमलबजावणी, गाव संघटन या त्रिसूत्रीवर काम सुरू असल्याचे बंग यांनी सांगितले.



**नागपूर, २ डिसेंबर**

कुपोषण कमी झाले असले तरी संथगतीने म्हणजे वर्षाला १ टक्का असून ते टाळण्यासाठी कुपोषित मातेचे पोषण, आयसीडीएस घरोघरी नेणे, जंतुसंसर्गावर प्रतिबंध तसेच यंत्रणेच्या कार्यपद्धतीत बदल या चतु:सूत्रीचा अवलंब करावा लागेल, असे मत सर्चचे प्रमुख व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केले.

न्युरोलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया व नागपूर न्युरो सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

जागतिक न्युसिकॉन परिषदेत ते सहभागी झाले. त्यानंतर त्यांनी पत्रकारासोबत संवाद साधला. डॉ. बंग म्हणाले, मागील १५ वर्षात कुपोषण अत्यंत कमी गतीने कमी होत आहे. सरासरी गती वर्षाला १ टक्का असून बालमृत्यू कमी होण्याची गती वर्षाला सरासरी ५ टक्के आहे. वर्षाला आज महाराष्ट्रात ५० ते ६० हजार बालमृत्यू होतात. म्हणजेच वर्षात प्रति हजार २४ बालमृत्यू कमी झाले.

विदर्भ, महाराष्ट्रातील गामीण भागात कुपोषण आहे. शहरी भागात अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. बालमृत्यू, नवजात मृत्यूचे प्रमाण कमी करणे हे ध्येय असायला हवे. त्यासाठी आशा वर्कर, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य यंत्रणांना सक्षम करावे लागेल. कुपोषण कमी होण्याची गती कमी आहे. आर्थिक स्थिती, आईचे शिक्षण, हागणदारी, आईचे कुपोषण नको, हे चुटकीसरशी कमी होणारे नाही. आर्थिक सुधार हवेत. त्याशिवाय आईचे पोषण होणार नाही. हागणदारी कमी व्हायला हवी. कुपोषणाने मेंदूचा विकास आवळला जातो. त्याचा आयुष्यभर परिणाम होतो. बुद्धीच्या कुपोषणाचा परिणाम समाज व देशावर होतो. कुपोषण कमी करण्यासाठी शासनाने ग्रोथ स्ट्रॅटेजी स्वीकारली आहे. विकासावर भर दिला म्हणजे त्यातून समाजकल्याण होते, असे सरकारला वाटते.

एकात्मिक बाल विकास योजना (आयसीडीसी) बंद करा, असे म्हणणे नाही. पण, त्यात सुधारणेची गरज आहे. या योजनेअंतर्गत अंगणवाड्यात मुले ताट घेऊन जेवायला येतात. संबंधित केंद्रात जाणे किमान तीन वर्षांच्या बालकांनाच शक्य आहे. वास्तविक कुपोषण आईच्या गर्भात असतानाच असते. याचा विचार केल्यास तीन वर्षे म्हणजे उशीर झालेला असतो. त्यामुळे कुपोषण संपविण्यासाठी घरोघरी जाण्याची गरज आहे. दुसरा भाग जंतुसंसर्गाचा. नागपूरच्या मेडिकल रुग्णालयाचे पहिले बालरोग विभागाचे प्रमुख डॉ. सूर यांनी कुपोषणाचे एक कारण जंतुसंसर्ग असल्याचे १९७० मध्ये सर्वप्रथम मांडले होते. उघड्यावर शौचमुळे जंतुसंसर्ग होतो. स्वच्छता नसल्याने जंतुसंसर्ग होऊन ताप, हिवताप आणि विविध आजार होतात. आयसीडीसीसाठी भारतात किमान ३० हजार कोटी (जुनी आकडेवारी) रुपये खर्च केले जातात. या योजनेत नीट परिवर्तन व्हायला हवे. नवे रचनात्मक बदल व्हायला हवेत.

कुपोषण टाळण्यासाठी कुपोषित मातेचे पोषण, आयसीडीएस घरोघरी नेणे, जंतुसंसर्गावर प्रतिबंध तसेच यंत्रणेच्या कार्यपद्धतीत बदल या चतु:सूत्रीचा अवलंब करावा लागेल, यावर डॉ. अभय बंग यांनी भार दिला.

*(तभा वृत्तसेवा)*